।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।
४१ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

साप्ताहिक
# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३
RNI NO.
MAH/MAR/2004/16467
POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026
FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४२ वे नवीन वर्ष २२ वे | रविवार दि १० ऑगस्ट २०२५ | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक ३३ वा

## सांगोला येथे व्यापारी संकुलाच्या पाया खोदकामात सापडले प्राचीन बांधकामाचे अवशेष



सांगोला : सांगोला शहरातील जुना धान्य बाजार (खंदक) परिसरात नव्याने उभारण्यात येणाऱ्या व्यापारी संकुलाच्या बांधकामासाठी पाया खोदण्याचे काम सुरु असताना सोमवारी सुमारे १५ ते २० फूट खाली दगडी चौकोनी आकाराचे प्राचीन बांधकाम व पश्चिम बाजूस पूर्व– पश्चिम दिशेने तटबंदीची भिंत आढळून आली आहे.

या अवशेषांच्या शोधामुळे परिसरातील नागरिकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. सांगोला शहराचा इतिहास फार जुना व समृद्ध आहे. शहरातील भुईकोट किल्ला हा आदिलशाही, शिवशाही व मोगल साम्राज्याच्या काळात लष्करी दृष्ट्या महत्वाचे ठाणे म्हणून ओळखला जात होता. आजही या किल्ल्याचे काही बुरुज व तटबंदी शहरात उभ्या असून त्यांचा जीर्णोद्धार होण्याची प्रतीक्षा आहे. व्यापारी संकुल उभारण्यात येत असलेल्या खंदक भागालाही ऐतिहासिक महत्त्व आहे. पाया खोदकामाच्या वेळी सापडलेले दगडी अवशेष व तटबंदीचे अवशेष नेमके कशाचे आहेत, हे पाहण्यासाठी मोठ्या संख्येने नागरिक घटनास्थळी दाखल झाले. काही इतिहास अभ्यासकांनी याठिकाणी प्राचीन वास्तूचा संदर्भ असल्याचा अंदाज व्यक्त केला असून, पुरातत्त्व विभागाने तातडीने उत्खनन करावे, अशी मागणी होत आहे.

सांगोला नगरपरिषदेच्या वतीने व्यापारी संकुलाचे काम सुरू असताना अशा प्रकारे प्राचीन बांधकाम सापडल्याने स्थानिक प्रशासनाने तातडीने या घटनेची दखल घेतली आहे. नगरपरिषद मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली असून पुढील कार्यवाहीसाठी वरिष्ठांकडे अहवाल सादर करण्यात आला आहे.

इतिहास अभ्यासक नितीन अणवेकर यांनी सांगितले की, सांगोला गावाच्या मध्यवर्ती भागात भुईकोट किल्ला होता. त्याची दुहेरी तटबंदी होती. सद्यस्थितीत दिसणारे अवशेष या तटबंदीचेच असावेत असे प्रथमदर्शनी दिसून येते. पुरातत्त्व विभागाने पाणी उपसून सखोल उत्खनन केल्यास हे अवशेष कोणत्या वास्तूचे आहेत ते स्पष्ट होईल. या घटनेची माहिती पुणे येथील पुरातत्त्व विभागाला देण्यात आली असून त्यांनी प्राथमिक स्वरूपात या घटनेची दखल घेतली आहे. लवकरच पुरातत्त्व विभागाचे अधिकारी सांगोला येथे भेट देऊन स्थळ पाहणी करणार असल्याची माहिती मिळत आहे. सांगोला शहराच्या ऐतिहासिक वारशाचा दृष्टिकोन लक्षात घेता, सापडलेले हे अवशेष भविष्यात सांगोल्याच्या इतिहासातील नवा दस्तऐवज ठरू शकतो, अशी प्रतिक्रिया अभ्यासकांमधून व्यक्त होत आहे. त्यामुळे प्रशासन व पुरातत्त्व विभागाने तातडीने उत्खनन व अभ्यास सुरु करावा, अशी नागरिकांची मागणी आहे.

## स्व.आ.डॉ. भाई गणपतरावजी देशमुख यांच्या ९८ व्या जयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन



सांगोला : सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, सांगोला संचलित डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालय, सांगोला व न्यू इंग्लिश स्कूल पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम, सांगोला या सर्वांच्या संयुक्त विद्यमाने १० ऑगस्ट ते १३ ऑगस्ट या कालावधी मध्ये न्यू इंग्लिश स्कूल सांगोला या कॅम्पस मध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

१० ऑगस्ट ह्या दिवशी स्व.आ.डॉ. भाई गणपतरावजी देशमुख यांची जयंती सांगोला शहर व तालुक्यात मोठ्या उत्साहात साजरी केली जाते त्याचाच एक भाग म्हणून इंग्लिश स्कूल सांगोला या कॅम्पस मध्ये श्रमिक दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार दि. १० ऑगस्ट रोजी स्व.आ.डॉ. भाई गणपतरावजी देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर सोमवार दिनांक ११ ऑगस्ट रोजी सकाळी ८:०० वा. भव्य रक्तदान शिबीर व विविध गटातील तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. मंगळवार दिनांक १२ ऑगस्ट रोजी विविध गटातील तालुकास्तरीय रंगभरण स्पर्धा व लोकनृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

बुधवार दिनांक १३ ऑगस्ट रोजी सकाळी ७:०० वाजता खुल्या गटातील राज्यस्तरीय मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यानंतर त्याच दिवशी सकाळी १०:०० वा. मुख्य कार्यक्रम पारितोषिक वितरण समारंभ याचे आयोजन करण्यात आलेले आहे. मुख्य कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ साहित्यिक व विचारवंत प्रा.व.बा. बोधे व कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे अध्यक्ष डॉ.अनिकेत देशमुख हे उपस्थित राहणार आहेत.

तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून संस्थेचे सचिव मा.श्री. विठ्ठलराव शिंदे सर व सर्व संचालक मंडळ उपस्थित राहणार आहेत. या भव्य दिव्य कार्यक्रमाचा लाभ सांगोला शहर व तालुक्यातील सर्व विद्यार्थी व आबासाहेब प्रेमी लोकांनी घ्यावा असे आवाहन डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिकंदर मुलाणी, न्यू इंग्लिश स्कूल व ज्यू. कॉलेजचे प्राचार्य श्री. केशव माने सर व न्यू इंग्लिश स्कूल पूर्व प्राथमिक व प्राथमिकचे प्राचार्य श्री.दिनेश शिंदे सर तसेच कार्यक्रमाचे संयोजक प्रा.अशोक कांबळे यांनी केले आहे, अशी माहिती प्रसिद्धी कमिटीचे चेअरमन प्रा. बाळासाहेब सरगर यांनी दिली

## महसूल सप्ताहातंर्गत सांगोला तालुक्यातील ६८ लाभार्थ्यांना ५०० चौ.फुटाचे प्लॉट वाटप व ७६० दाखले वाटप

सांगोला : महसुल वर्ष १ ऑगस्ट ते ३१ जुलै असे गणले जाते. १ ऑगस्ट हा महसूल दिन म्हणून साजरा केला जातो. राज्यशासन या निमित्ताने विविध कार्यक्रम उपक्रम उपाययोजना हाती घेत असते. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावर्षी महसूल सप्ताह १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट असा साजरा करण्याचा व त्यामध्ये विविध उपक्रम उपाययोजना यांची अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत.

या सप्ताहातंर्गत सांगोला तालुक्यातील ६८ लाभार्थ्यांना ५०० चौ.फुटाचे प्लॉट वाटप करण्यात आले असल्याची माहिती तहसीलदार संतोष कणसे यांनी दिली. सांगोला तहसिल कार्यालर्याअंतर्गत आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांचे हस्ते सेवानिवृत्त कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे गतवर्षी उत्कृष्ठ काम करणारे नायब तहसिलदार, सहा, महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी, महसूल सहाय्यक,महसूल अधिकारी, ग्राम महसूल सेवक त्याचप्रमाणे प्रत्येक मंडळातील एक पोलीस पाटील यांना प्रशिस्तीपत्रक. ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला.

याच कार्यक्रमाल घरकुल लाभार्थी ज्यांना जमीन नाही असे एकूण ६८ लाभार्थ्यांना ५०० चौ. फुट चे प्लॉटस वाटप करण्यात आलेले आहेत.यापैकी चिंचोली, लोटेवाडी व कडलास या गावातील १७ लाभार्थ्यांना पटट्याचे वाटप करण्यात आले. दिनांक ३ व ४ ऑगस्ट रोजी पाणंद/शिवरस्त्यांच्या दुतर्फा वृक्षलागवडीचा कार्यक्रम मौजे धायटी, चिचोली, अकोला, डोंगरगाव, तिप्पेहाळी, गौडवाडी,सोनंद,आलेगांव चिकमहुद या गावात घेण्यात आला. याच उपक्रमांतर्गत शेतरस्त्यांची गाव नमुना ७/१२ वर नोंद घेणे व जास्तीत जास्त शेतकऱ्यांना सहभागी करुन सर्व रस्त्यावर येत्या एक महिन्यात वृक्षारोपण पुर्ण करण्यासाटी प्रयत्नशील राहणे असे निश्चित करण्यात आलेले आहे. प्रत्येक महसूल मंडळ मुख्यालयी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान दिनांक ०४ व ०५ ऑगस्ट रोजी शिबिरे घेण्यात आली.

या शिबिरामध्ये उत्पन्न, जात, आदिवास इत्यादी प्रकारचे ७६० दाखले वाटप करण्यात आले,विशेष सहाय्य योजनेतील डीबीटी न झालेल्या लाभार्थ्यांना घरभेटी देवून अनुदानातील अडचणी सोडविणे सामाजिक न्याय विभागाच्या लाभार्थ्यांची सत्यापन ॲप वर नोंद करणे त्याचप्रमाणे ग्रोस्टैंक योजनेअंतर्गत फार्मर आयडी काढणे व चालू वर्षाच्या इंपीक पाहणीसाठी शेतक–यांना प्रोत्साहित करणे हा उपक्रम दिनांक ०५ ऑगस्ट रोजी हाती घेण्यात आला.दिनांक ०६ ऑगस्ट रोजी शासकीय जमीनीवरील अतिक्रमणे निष्कासीत करणे किवा शासन धोरणानुसार नियमानुकुल करणे किंवा सरकार जमा करणे याबाबतचे निर्णय घेण्याची अंमलबजावणीचे काम हाती घेतले जाणार आहे.सप्ताहाच्या शेवटी मॅन्युफॅक्चरड सेंड धोरणानुसार उपाययोजना सरकारी, खाजगी गटाची माहिती देणे. त्यांना सदर उपयोग करण्यासाठी त्यांची मनोभूमिका/मानसिकता तयार करणे, त्यांना प्रत्सोहन देणे असे उपक्रम हाती घेण्यात आले असल्याची माहिती तहसीलदार संतोष कणसे यांनी दिली.

## स्व.डॉ.गणपतराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त महुद येथे जिल्हास्तरीय बुध्दीबळ व वकृत्व स्पर्धांचे आयोजन

सांगोला : स्व.डॉ. गणपतराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त महूद बु ता.सांगोला येथील देव बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने फीनिक्स प्राथमिक मराठी, सेमी इंग्रजी माध्यम आणि ज्युनियर कॉलेजच्या संयुक्त विद्यमाने भव्य जिल्हास्तरीय बुद्धिबळ आणि वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

या दोन्ही स्पर्धा मंगळवार, दि. १२ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९ वाजता फीनिक्स संकुलात होणार आहेत. बुद्धिबळ स्पर्धेसाठी '१ ली ते ४ थी' आणि '५ वी ते खुला गट' असे दोन गट असून, दोन्ही गटांसाठी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी अनुक्रमे रु. ३००१/–, रु. २००१/– आणि रु. १००१/– अशी बक्षिसे दिली जाणार आहेत. स्पर्धकांनी आपला स्वतःचा बुद्धिबळाचा पट सोबत आणणे आवश्यक आहे. वक्तृत्व स्पर्धेसाठी 'मा. आमदार भाई गणपतरावजी देशमुख यांचे चरित्र' हा विषय निश्चित करण्यात आला आहे. यासाठी १ ली ते ४ थी, ५ वी ते ८ वी आणि ९ वी ते १२ वी खुला गट' असे तीन गट आहेत. १ ली ते ४ थी' गटासाठी वेळेची मर्यादा ४ मिनिटे असून, प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी अनुक्रमे रु. ७०१/– , रु. ५०१/– आणि रु. ३०१/– अशी बक्षिसे आहेत. ५ वी ते ८ वी' गटासाठी ५ मिनिटे आणि '९ वी ते १२ वी खुला गट' यासाठी ७ मिनिटे वेळ दिला जाईल. या दोन्ही गटांसाठी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी अनुक्रमे रु. ३००१/–, रु. २००१/– आणि रु. १००१/– अशी बक्षिसे आहेत. स्पर्धकांना आपले भाषण एका कागदावर लिहून आणणे बंधनकारक आहे. या स्पर्धांमध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्या स्पर्धकांनी सोमवार, दि. ११ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत आपली नावे नोंदवावीत.

अधिक माहितीसाठी ९७६७५८३५३०, ७५८८०५०७२२, ९६५७६४६६४७, ९५२७५३२३८२ या क्रमांकांवर संपर्क साधावा. मागील वर्षी प्रथम क्रमांक आलेल्या स्पर्धकांना यावर्षी सहभागी होता येणार नाही, असे संयोजकांनी स्पष्ट केले आहे.

# स्व.भाई डॉ.गणपतरावजी देशमुख यांच्या पुण्यस्मरण व जयंतीनिमित्त महाआरोग्य तपासणी शिबिर ,महा रक्तदान शिबिर उत्साहात संपन्न



सांगोला : सांगोला तालुक्याचे भाग्यविधाते स्वर्गीय भाई गणपतरावजी देशमुख यांच्या पुण्यतिथी व जयंतीनिमित्त सांगोला तालुक्यातील शेतकरी कष्टकरी यांना मोफत आरोग्य सेवा मिळावी यासाठी महाआरोग्य तपासणी व महा रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन श्रीमती रतनबाई गणपतरावजी देशमुख, डॉ. निकिताताई बाबासाहेब देशमुख व विविध मान्यवरांच्या शुभहस्ते संपन्न झाले.


स्वर्गीय भाई गणपतरावजी देशमुख साहेब यांनी घेतलेला जनसेवेचा वसा आणि वारसा पुढे अखंडपणे चालू ठेवण्याचे काम देशमुख कुटुंबियांच्या माध्यमातून होत आहे. स्वर्गीय भाई गणपतरावजी देशमुख साहेब मेडिकल फाउंडेशन चा आजच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून श्री गणेशा करण्यात आला. हे फाउंडेशन स्थापन करण्यामागचे कारण की , स्वर्गीय डॉ.भाई गणपतरावजी देशमुख यांनी जो ,सामाजिक बांधिलकी व जनसेवेचा वसा आणि वारसा घेतलेला आहे तो पुढे अखंडपणे चालू ठेवण्याचे काम देशमुख कुटुंबीयांच्या माध्यमातून होत आहे . स्वर्गीय भाई गणपतरावजी देशमुख साहेब यांचे दोन नातू व नात सुना हे वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित असून त्यांच्या माध्यमातून सांगोला तालुक्यातील व आजूबाजूच्या तालुक्यातील सर्वसामान्य जनतेची मोफत आरोग्य सेवा घडावी हे या माध्यमातून होत आहे. यासाठी स्वर्गीय भाई डॉ. गणपतरावजी देशमुख साहेब यांच्या मेडिकल फाउंडेशन चा श्री गणेशा विविध मान्यवरांच्या शुभ हस्ते करण्यात आला. यावेळी डॉ. निकिताताई बाबासाहेब देशमुख, डॉ.प्रभाकर माळी,डॉ.अमर शेंडे यांनी यावेळी विचार व्यक्त केले. सांगली व सोलापूर जिल्ह्यातील सर्व तज्ञ डॉक्टर्स सदरच्या शिबिरासाठी उपस्थित होते यामध्ये डॉ. सुनिल कारंडे फिजिशियन,डॉ. सुनिता कारंडे नेत्ररोग तज्ञ, डॉ अमित इनामदार – कैन्सर स्पेशालिस्ट,डॉ सचिन वाघमोडे कान नाक घसा तज्ञ ,डॉ हिमांशु कुलकर्णी स्पाईन सर्जन मिरज,डॉ अमर शेंडे आनंद हॉस्पिटल ,डॉ अजिंक्य नष्टे अजिंक्यतारा हॉस्पिटल ,डॉ .शिवराज भोसले ,डॉ.मच्छिंद्र सोनलकर दक्षता मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, पाटील बालरुग्णालय डॉ.बसवेश्वर पाटील हॉस्पिटल,श्रीनंद हॉस्पिटल डॉ राजेंद्र जानकर,लवटे हॉस्पिटल डॉ सुनील लवटे ,सद्गुरू हॉस्पिटल डॉ धनंजय गावडे ,डॉ एच व्ही गावडे– गावडे बालरुग्णालय ,डॉ वैभव जांगळे स्पंदन हॉस्पिटल ,दिशा हॉस्पिटल डॉ सचिन गवळी ,डॉ. स्वाती खंडागळेस्त्रीरोगतज्ज्ञ उपस्थित होते.

सांगोला तालुक्यातील सर्व सोलापूर जिल्ह्यातील महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेची संलग्न असणारे सर्व रुग्णालय आणि सर्व तालुका वैद्यकीय अधिकारी व प्राथमिक आरोग्य केंद्र यांचा सर्व स्टाफ कर्मचारी, ग्रामीण रुग्णालय सांगोला यांचे सर्व डॉक्टर्स व सर्व स्टाफ कर्मचारी महा लॅब यांच्या माध्यमातून रक्त तपासणी करण्यात आली. तसेच बोल डेन्सिटी टेस्ट म्हणजेच हाडाची ठिसूळता तपासणी पुणे येथील वैद्यकीय प्रतिष्ठान यांच्या माध्यमातून करण्यात आली.

श्री नागेश बनसोडे तालुका समन्वयक महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व टीम यांच्यामार्फत सर्व रुग्णांना आयुष्यमान कार्ड व गोल्डन कार्ड काढून देण्यात आले. महाआरोग्य तपासणी शिबिरासाठी उद्योगपती श्री. गिरीशभाऊ नष्टे यांनी हॉल उपलब्ध करून दिला.नँब आय कुपवाड सांगली आणि डॉ.थेंगील यांच्या वतीने डोळे तपासणी करण्यात आली. श्री शहाजी गडहिरे यांच्या अस्तित्व संस्था यांच्यामार्फत पूर्णपणे मोफत चष्मे वाटप करण्यात आले प्रास्तावित ज्येष्ठ स्त्री रोग तज्ञ डॉ. विजय बंडगर यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. निरंजन केदार यांनी केले. सूत्रसंचालन श्री.प्रवीण घाडगे यांनी केले.


# विनम्र अभिवादन !!!

आशिर्वाद



स्व.मा. आ. डॉ. भाई गणपतराव देशमुख

सांगोला तालुक्याचे भाग्यविधाते
स्वर्गीय मा. आ.डॉ. भाई गणपतरावजी देशमुख
यांच्या ९८व्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन

॥ अभिवादक ॥

## सांगोला अर्बन को-ऑप. बँक लि., सांगोला.

सि. स. नं. २९२४/५, अ व ब, रेल्वे गेट जवळ, मिरज रोड, सांगोला

### बँकेच्या वर्धापन दिनानिमित्त विशेष योजना

ठेव पंधरवडा
मर्यादित कालावधी
दि. ५ ऑगस्ट २०२५ ते दि. २० ऑगस्ट २०२५

मुदत ठेवीवर आकर्षक व्याजदर

| मुदत | व्याजदर |
|---|---|
| ७ दिवस ते २९ दिवस | ४.२५% |
| ३० दिवस ते १८४ दिवस | ६.२५% |
| १८५ दिवस ते १ वर्ष | ६.७५% |
| १ वर्षापुढील ते ३ वर्ष | ८.७५% |
| ३ वर्षापुढे | ८.00% |
| दाम दुप्पट | ८ वर्ष ९ महिने |

• ज्येष्ठ नागरीक व सहकारी संस्थांना 0.५0% जादा व्याजदर •

• लखपती रिकरींग ठेव योजना •

| | |
|---|---|
| दरमहा फक्त रु. १३४०/– भरा | रुपये १.00 लाख मिळवा |
| दरमहा फक्त रु. १३२०/– भरा (जेष्ठ नागरीक) | रुपये १.00 लाख मिळवा |
| कालावधी फक्त ६० महिने | |

• पेन्शन ठेव योजना •

| एकवेळ भरावयाची रक्कम | दरमहा मिळणारी रक्कम (कालावधी ६० महिने) नियमित ठेवीदार | ज्येष्ठ नागरीक ठेवीदार |
|---|---|---|
| रु. १.00 लाख | रु. ६६२/– | रु. ७0३/– |
| रु. ५.00 लाख | रु. ३३११/– | रु. ३५१७/– |
| रु. १0.00 लाख | रु. ६६२३/– | रु. ७0३४/– |

### कर्ज सुविधा

सोने दागिने तारण कर्ज ९.00%
वाहन कर्ज ९.५0%
सोलर कर्ज १0.00% सोलर खरेदीसाठी १00%कर्ज
घरगुती उपकरणे खरेदी कर्ज १0.00%

कर्जावरील व्याजदर

| कर्जप्रकार | व्याजदर | कर्जप्रकार | व्याजदर |
|---|---|---|---|
| सोने तारण कर्ज | ९.00% | वाहन कर्ज (व्यावसायिक) | १२.00% |
| सोने तारण कॅश क्रेडीट | १0.00% | सोलर खरेदी योजना | १0.00% |
| वाहन कर्ज (वैयक्तिक) | ९.५0% | टर्म लोन | १३.00% |
| प्रोफेशनल कर्ज | १0.00% | बांधकाम (व्यावसायिक) | १३.00% |
| घरगुती उपकरणे खरेदी | १0.00% | पगार तारण कर्ज | १४.00% |
| घरबांधकाम (वैयक्तिक) | ११.00% | विनातारणी रु. २ लाखापर्यंत | १६.00% |
| कॅश क्रेडीट | १२.00% | ठेवपावती तारण कर्ज | ठेवीवरील व्याजदरापेक्षा १.00% जास्त |

आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ व महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ (ओबीसी महामंडळ), वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ व इतर सर्व महामंडळाच्या योजनेअंतर्गत सर्व प्रकारच्या व्यवसायासाठी कर्ज उपलब्ध (व्याज परतावा)

अधिक माहितीसाठी नजिकच्या शाखेत संपर्क साधा :

शाखा : मुख्य शाखा सांगोला, अकलूज, पंढरपूर, महुद बु।।, कमलापूर, आटपाडी, सांगोला शहर, माढा


साप्ताहिक माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com

संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष–४२ वे अंक–३७ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

विनम्र अभिवादन!!

शेतकरी कष्टकरी जनतेचे नेते,सांगोला तालुक्याचे भाग्यविधाते,
अनेक सहकारी संस्थांचे मार्गदर्शक,माणदेश भूषण,
शे.का. पक्षाचे जेष्ठ नेते आमचा स्वाभिमान

स्वर्गीय मा. आ. डॉ. भाई गणपतराव देशमुख
यांच्या जयंती निमित्त

*मेडिक्लेम कॅशलेस सुविधा
*मुख्यमंत्री सहाय्यतानिधी योजने अंतर्गत सांधा बदली शस्त्रक्रियासाठी (THR, TKR) शासनाकडून आर्थिक सहाय्य
*मोफत शस्त्रक्रिया उपचार
*मुख्यमंत्री जन आरोग्य योजना

नाव नोंदणीसाठी : ७०३० २२२ ९८१, इमरजेन्सी : ९४२३ २७६ ४४२

-उपलब्ध सुविधा-
*सर्व प्रकारच्या फ्रैक्चर, ॲक्सिडेंट आणि ट्रॉमा केअर
*आर्थोस्कोपी (खांदा, गुडघा निसटणे उपचार)
Vascular Surgery Plastic Surgery
कृत्रिम सांधारोपण शस्त्रक्रिया * (जबड्याची शस्त्रक्रिया)
मणक्याचे सर्व आजाराचे निदान व उपचार




विनम्र अभिवादन

डॉ. सचिन गवळी MBBS,D.Ortho (Mumbai) अस्थिरोग तज्ञ

दिशा हॉस्पिटल । फ्रॅक्चर । ॲक्सिडेंट । सर्जिकल । ट्रॉमा । जॉईंट रिप्लेसमेंट सेंटर कडलास नाका, सांगोला



विनम्र अभिवादन !!



शेतकरी कष्टकरी जनतेचे नेते,सांगोला तालुक्याचे भाग्यविधाते,
अनेक सहकारी संस्थांचे मार्गदर्शक,माणदेश भूषण,
शे.का. पक्षाचे जेष्ठ नेते आमचा स्वाभिमान

स्वर्गीय मा. आ. डॉ. भाई गणपतराव देशमुख
यांच्या जयंती निमित्त

विनम्र अभिवादन

॥ अभिवादक ॥

ॲड.संजीवकुमार शिंदे
माजी नगरसेवक,सांगोला नगरपरिषद,सांगोला
शिंदे परिवार,सांगोला


# सांगोला अर्बन बँकेच्या वर्धापनदिनानिमीत्त रक्तदान शिबीर व मंगळागौर स्पर्धेचे आयोजन

सांगोला : सांगोला अर्बन बँकेच्या २९ व्या वर्धापनदिनानिमीत्त व स्व.डॉ.भाई गणपतराव देशमुख यांच्या जयंतीनिमीत्त सांगोला अर्बन बँक, रोटरी क्लब, सांगोला व इनरव्हील क्लब, सांगोला यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि.१० ऑगस्ट २०२५ रोजी रक्तदान शिबीर व महिलांसाठी मंगळागौर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार दि. १० ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वा. बँकेच्या मिरज रोड रेल्वे गेट जवळील मुख्य कार्यालयात रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले असून सदर शिबीरात रक्तदान करण्या-या रक्तदात्यांना बँकेकडून आकर्षक भेट वस्तू देण्यात येणार आहे.

तसेच रविवार दि. १० ऑगस्ट २०२५ रोजी दु. १.०० वा. महिलांसाठी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर सभागृह, सांगोला येथे भव्य मंगळागौर स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेतील विजेत्या ग्रूपसाठी प्रथम क्रमांकास रोख बक्षीस रु. ५,०००/- व ट्रॉफी, द्वितीय क्रमांकास रोख बक्षीस रु.३,०००/- व ट्रॉफी व तृतीय क्रमांकास रोख बक्षीस रु. २,०००/- व ट्रॉफी जाहीर करण्यात आले आहे.

स्पर्धेत भाग घेण्यासाठी महिलांनी आपल्या पारंपारिक वेषभुषेत भाग घ्यावयाचे असून आपले सादरीकरणाचे गीत हे १० मिनीटापेक्षा कमी वेळाचे असावे. सादरीकरणाचे गीत हे रिमिक्स असू नये. स्पर्धेत भाग घेण्यासाठी प्रवेश नि:शुल्क असून नांव नोंदणी करण्यासाठी डॉ. सौ. संगिता पिसे मो. ९०११४१०९९८ व ॲड. सौ. चैत्रजा बनकर मो. ९६५७०८४८१९ यांच्याशी संपर्क साधावा.

तरी बँकेच्या वर्धापनदिनानिमीत्त आयोजित केलेल्या रक्तदान शिबीर व मंगळागौर स्पर्धेत आपला सहभाग नोंदवावा. असे आवाहन बँकेच्या वतीने करण्यात येत आहे.


विनम्र अभिवादन !!



स्वर्गीय मा. आ. डॉ. भाई गणपतराव देशमुख

सांगोला तालुक्याचे भाग्यविधाते,
शेतकरी कष्टकरी जनतेचे नेते,
अनेक सहकारी संस्थांचे मार्गदर्शक,माणदेश भूषण,
स्व.मा. आ. डॉ. भाई गणपतराव देशमुख
यांना जयंती निमित्त
विनम्र अभिवादन

॥ अभिवादक ॥

डॉ. लवटे ऑर्थोपेडिक हॉस्पिटल
ॲन्ड ट्रॉमा केअर युनिट
फ्रॅक्चर आणि ॲक्सीडेंट हॉस्पिटल
सांगोल्यातील एकमेव NABH मानांकित हॉस्पिटल


डॉ.सुनिल लवटे
M.B.B.S.D.Ortho.(अस्थिरोगतज्ञ)

डॉ.सौ.प्रज्ञा लवटे
M.B.B.S.D.A (भूलतज्ञ)

पोलिस लाईन शेजारी,पंढरपूर रोड सांगोला फोन-०२१८७/२२२३३३



विनम्र अभिवादन !!



स्वर्गीय मा. आ. डॉ. भाई गणपतराव देशमुख

शेतकरी कष्टकरी जनतेचे नेते,
सांगोला तालुक्याचे भाग्यविधाते,
अनेक सहकारी संस्थांचे मार्गदर्शक,माणदेश भूषण,
स्व.मा. आ. डॉ. भाई गणपतराव देशमुख
यांना जयंती निमित्त
विनम्र अभिवादन

॥ अभिवादक ॥

मा. श्री. गिरीषभाऊ नष्टे
चेअरमन, अजिंक्यतारा नागरी पतसंस्था मर्या.सांगोला
अजिंक्यतारा मल्टीकेअर हॉस्पिटल, डॉ. अजिंक्य नष्टे
अजिंक्य लॉज (राहण्याची उत्तम सोय)

अजिंक्य टायर्स, (एम. आर. एफ. चे अधिकृत विक्रेते)
पत्ता : एस. टी. स्टँड समोर, सांगोला
प्रोप्रा. निलेश नष्टे

# विनम्र अभिवादन !!

ऋषितुल्य नेतृत्व, शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते

## स्व.मा.आ.भाई गणपतरावजी देशमुख

यांच्या ९८ व्या जयंती निमित्त त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन !!!



स्व.आम.भाई गणपतरावजी देशमुख

चेअरमन, आर.डी.सी.सी.बँक



मा.आ.जयंतराव पाटील

## अभिवादक




घर बांधायचे आहे ....नविन गाडी खरेदी करायची आहे, शेतीसाठी व मुलांचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी कर्ज घ्यायचे आहे?

आपले स्वप्न साकार करण्यासाठी सदैव तत्पर.......

आपली जिव्हाळ्याची बँक

सहकारनिष्ठ, सहकार भूषण आणि ....
सहकारातील सर्वोच्च असा
सहकारमहर्षी पुरस्कार मिळविणारी
महाराष्ट्रातील एकमेव जिल्हा मध्यवर्ती बँक

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., अलिबाग



केंद्र कार्यालय : चेंढरे–अलिबाग
फोन : ०२१४१–२२४३१५,२२४३१६
Email - rdccpen@gmail.com Web - www.rdccbank.com

mahendra 8149981148